# एका इतिहासकाराचे मनोगत

## श्रद्धा कुंभोजकर

***श्रद्धा कुंभोजकर यांना नुकताच 'कै. प्रकाशचंद्र सुराणा ज्येष्ठ इतिहासकार पुरस्कार, २०२५' देण्यात आला. त्या प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणात - इतिहास कसा लिहिला जातो, त्यात कोणकोणते काम आधारभूत असते, कोणत्या अडचणी येतात अशा काही मुद्द्यांवर मांडणी केली आहे. त्यातला निवडक भाग.***

घडलेल्या घटनांची कुणीतरी नोंद ठेवतं. या विखुरलेल्या नोंदी निवडून, आपापल्या दृष्टिकोनानुसार रचना करून त्या रचनेचा शक्य तितका सत्यनिष्ठ असा अन्वयार्थ मांडणं हे इतिहासकार करत असतात. त्यामुळे अन्वयार्थ ही तर इतिहासकारांची निर्मिती असतेच, पण घटनांच्या नोंदी निवडून त्यांची रचना करणं यातदेखील इतिहासकार महत्त्वाची भूमिका निभावत असतात. या घडलेल्या गोष्टींच्या नोंदी इतिहासकारापर्यंत कशा येतात? तर कुणीतरी प्रजेच्या संरक्षणाच्या हेतूनं किल्ले बांधून ठेवतं. कुणी वस्तूंची देवाणघेवाण सोपी होण्यासाठी नाणी पाडतात. कुणी आपापल्या काळानुसार गाणी, गोष्टी रचून ठेवतात. कुणी आपलं कर्तृत्व दगडात वगैरे कोरून ठेवतात. असे पुरातत्त्वीय, नाणकशास्त्रीय, साहित्यिक, पुराभिलेखीय पुरावे इतिहासकार आपापल्या विषयानुसार निवडून वापरतात. अर्थातच पुरातत्त्व, नाणकशास्त्र, भाषाशास्त्र,



*इतिहासाचे पुरावे : नाणी*
*स्रोत : विकीपेडिया*

ग्रंथालयशास्त्र अशी शास्त्रं ही इतिहासकाराच्या दृष्टीनं साहाय्यकारी शास्त्रं ठरतात. इतिहासकाराला या शास्त्रज्ञांनी केलेल्या कामावर अवलंबून पुढे अन्वयार्थ लावण्याच्या कामाकडे लक्ष देता येतं.

इतिहासकार हे सतत पडताळत रहातात, की आपल्या कामासाठी लागणारे पुरावे पुरवणारी ही मंडळी कितपत विश्वासार्ह आहेत, त्यांचे पुरावे कितपत अस्सल आहेत, वगैरे. त्यामुळे समजा महाकवी कालिदासानं असं लिहिलं की राजाच्या घोड्याच्या पायाची धूळ उडाल्यामुळेच चंद्रावर डाग आहेत, तरीही इतिहासकार ते सगळं खरंही मानत नाहीत आणि टाकाऊदेखील मानत नाहीत. तर कालिदासाच्या काळात राजेशाही माहीत होती, राजे घोडेस्वारी करत होते, चंद्राच्या पृष्ठभागाबाबतचं आकलन मर्यादित होतं - अशा अनेक पद्धतीचा अन्वयार्थ इतिहासकारांना या ओळीतून लावता येतो. आता हा पुरावा निवडून कालिदासाच्या काळाबाबत काही भाष्य करायचं की अशोककालीन शिलालेख घेऊन त्यांचा अभ्यास करायचा, ही निवड करण्याची स्वायत्तता इतिहासकारांकडे असते.

इतिहासकारांनी मांडलेल्या अन्वयार्थाच्या आधारानं अनेक शास्त्रं आपापला अभ्यास पुढे नेतात. म्हणजे समजा या वरच्या उदाहरणातल्या कालिदासविषयक ऐतिहासिक मांडणीचा उपयोग करून साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र, अर्थशास्त्र, प्राणिशास्त्र अशा अनेक शास्त्रज्ञांना आपापलं काम पुढे नेता येईल. सांगायचा मुद्दा असा की ही सगळी शास्त्रं एकाच माणसाला येणं अशक्य आहे आणि आपापलं शास्त्र आपल्या दृष्टीनं मुख्य आणि इतर शास्त्रज्ञांच्या दृष्टीनं साहाय्यकारी असतं. त्यामुळे इतिहासकार असून यांना अमुक एक शास्त्र, भाषा, लिपी कशी काय येत नाही - हा प्रश्न गैरलागू ठरतो. आंतरविद्याशाखीय पद्धतीनुसार

आपल्या कामासाठी लागणारी संदर्भसाधनं इतर शास्त्रांमध्ये झालेल्या कामामधून निवडली जातात. जसं आपलं कामदेखील पुढे कुणीतरी त्यांच्या कामासाठी आधाराला वापरतं.

इतिहासकारांना त्यातल्या त्यात काय करता येतं? तर आपण ज्या शास्त्रांवर अवलंबून काही मांडणी करतो, त्या विषयातली माहिती अस्सल आणि विश्वासार्ह संदर्भसाधनांमधून आपल्यापर्यंत पोचली आहे ना याची खातरजमा करता येते. शिवाय आपण वापरलेले संदर्भ आपल्या वाचकांसाठी पद्धतशीरपणे नोंदवून ठेवता येतात. आणि आपलं काम समाजापुढे वेगवेगळ्या माध्यमांमधून ठेवून समाजाची इतिहासाविषयीची, गतकालाविषयीची समजूत अधिक समृद्ध करता येते.

या कामात येणाऱ्या अडचणी - गतकाळाच्या नोंदी शोधणं, पडताळणं आणि त्यांची मांडणी करून अन्वयार्थ लावणं या इतिहासकार करत असलेल्या प्रक्रियांसाठी संदर्भसाधनांची उपलब्धता ही पूर्वअट असते. आज असं दिसतं की इंटरनेट आणि डिजिटायझेशनच्या माध्यमातून विविध प्रकारची संदर्भसाधनं आपल्या हातातल्या स्क्रीनवर सहज आणि मोफत पाहणं शक्य झालं आहे. पण त्याचवेळी जी साधनं अशा पद्धतीनं उपलब्ध नाहीत, त्यांचा अभ्यास करणं जिकीरीचं होत चाललं आहे. उदाहरणार्थ मला एकोणिसाव्या शतकातल्या मराठी नाटकांचा अभ्यास करायचा होता, तेव्हा लंडनपासून काकडवाडीपर्यंत अनेक ग्रंथालयांमध्ये शोध घेतल्यानंतरच ती नाटकं अभ्यासाला उपलब्ध झाली. डिजिटल स्वरूपात ही संदर्भसाधनं ऑनलाइन उपलब्ध नव्हती. आता या ग्रंथालयांमधल्या कर्मचारी मंडळींनी मला आणि आमच्या संशोधन सहाय्यकांना उत्तम सहकार्य केलं म्हणून ठीक. पण संदर्भसाधनांचे राखणदार नेहमीच असे मदतीला तत्पर

असतात असं नाही. आमच्याकडे ऐतिहासिक कागदपत्रं आहेत पण आम्ही ती ठरावीक लोकांनाच देऊ किंवा आमच्या आमच्यातच त्यांचं वाचन करू, इतरांना ती देणार नाही असा विचार करणारीही काही माणसं असतात. इतिहासकार अशा वेळी एकदा प्रयत्न करेल, दोनदा करेल - नंतर या कागदपत्रांशी संबंधित विषय सोडून देऊन वेगळ्या विषयावर काम करायला लागेल. ही सेल्फ-सेन्सरशिप- स्वत:वर आपण होऊनच घालावी लागलेली मर्यादा - शेवटी इतिहास या विषयाच्या अभ्यासाला मारक ठरते.

इतिहास या विषयाचं मर्यादित आकलन हीदेखील अभ्यासकांसाठी एक अडचण ठरते. म्हणजे विशिष्ट व्यक्ती, काळ किंवा जात-धर्मांच्या इतिहासात अडकून पडलं, तर जगात इतक्या विषयांवर, इतक्या विविध बाजूंनी इतिहास लिहिणं शक्य आहे हे समजत नाही. अशा वेळी इतिहासकारावर ही जबाबदारी येते की 'सितारोंके आगे जहां औरभी है', अशा पद्धतीनं चिरपरिचित विषयांच्या पलीकडचा इतिहास समाजापुढे ठेवायला हवा.

ज्यांना या विषयाचं प्रशिक्षण नाही असे लोक म्हणतात, इतिहासाच्या प्राध्यापकांना इतके पगार आहेत, ते आम्हांला हवा त्या पद्धतीनं, आम्हांला हवा त्या विषयाचा इतिहास का लिहीत नाहीत? तर विद्यापीठ म्हणजे काय, इतिहासकार म्हणजे काय, याचं पुरेसं आकलन नसल्यामुळे अशा प्राथमिक पातळीवरच्या शंका बोलल्या जातात.

ज्ञानाच्या क्षेत्रातही काहीसं प्रेमासारखं असतं. कुणी कोणत्या विषयावर संशोधन करावं हे मारून मुटकून ठरवता येत नाही. विद्यापीठीय व्यवस्थेमध्ये संशोधन करण्याचे मानदंड हे अतिशय काटेकोर असतात. मनात येईल तशी मतं मांडून इतिहास लिहिला असं सांगता येत नाही. कोणत्याही इतिहासाच्या विद्यार्थ्याला हे माहीत असतं की आपण जी

विधानं करतो ती भक्कम पुराव्याशिवाय करणं म्हणजे आपल्याच इतिहासलेखनाचा पाया भुसभुशीत ठेवणं. पण त्यासाठी आपण विद्यार्थी - विद्येची इच्छा ठेवणारे - व्हायला लागतं. पण अस्मिताबाजीच्या राजकारणामध्ये म्हणजे माझी जात, धर्म, लिंगभाव, माझा समूह हाच श्रेष्ठ आहे, हे दाखवण्याच्या खटाटोपात तथ्यनिष्ठ इतिहासलेखन करणं ही मोठी जिकीरीची गोष्ट होत चालली आहे. समाजमाध्यमातला गोंगाट हा या गदारोळात भर घालत राहतो.

तरीही इतिहासकार असणं ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

पहिलं म्हणजे इतिहासकाराला कोणताही विषय वर्ज्य नसतो. त्यामुळे रस्त्यानं जाताना दिसणाऱ्या साती आसरांच्या मंदिरातून आपण पाणी, लोकजीवन, दैवतशास्त्र अशी संस्कृतीची अनेक रूपं पाहू शकतो, हे इतिहासाच्या अभ्यासामुळे मला समजलं. मुघलकालीन लघुचित्र किंवा अजंठ्यातल्या भित्तीचित्रातून वनस्पतीजन्य रंग आणि त्यामागचं रसायनशास्त्र जाणता येतं, हे मला इतिहासामुळे समजलं. भारतीय ज्ञानव्यवस्थेसारख्या महत्त्वपूर्ण विषयाकडे पाहताना भारतीय उपखंडातल्या माणसांनी शेती, हवामान, अन्नपदार्थ, कपडे, दळणवळण, तत्त्वज्ञान अशा अनेक क्षेत्रांत कसा विचार केला होता, हे पहायला मी इतिहासामुळे शिकले. इतिहास आपल्याला लोलकातल्या प्रकाशकिरणासारखे गतकालाचे अनेक पैलू पहायला शिकवतो.

इतिहासकार असण्यातली दुसरी आनंददायी गोष्ट म्हणजे माणसांसोबत जोडलं जाणं. आमच्या इतिहास विभागात एकदा कर्नाटकातल्या एका तालुक्याच्या गावामधून एक गाडीभरून माणसं आली. त्यांची विचारपूस केल्यावर कळलं की कित्तूरच्या चेन्नम्मा

राणींबाबतची अधिकची माहिती महाराष्ट्रात मिळेल असं कळल्यामुळे त्यांनी तडक विद्यापीठ गाठलं होतं. माणसांना आपला गतकाळ समजून घेण्यासाठी विद्यापीठातल्या इतिहास विभागाकडे आणि इतिहासकारांकडे यावंसं वाटतं ही त्यांच्या मनातली आपुलकी फार दिलासादायक आहे. खासकरून सध्याच्या समाजमाध्यमांतल्या तथ्यविहीन संवादाच्या पार्श्वभूमीवर तर विशेष.

इतिहासकार असण्यातला तिसरा आनंदाचा भाग म्हणजे आपण जितके भूतकाळाशी जोडलेलो असतो, तितकंच भविष्यकाळासोबतही जोडून घेण्याच्या अनेक संधी इतिहासामुळे मिळतात. येणारी पिढी ज्या गतकाळाच्या आठवणी लक्षात ठेवेल, त्या निवडणं, त्यांची मांडणी करणं आणि लेख, पुस्तकं, पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून या आठवणींना इतिहासाचं रूप देण्याची संधी इतिहासकारांना मिळत असते. त्यामुळे गतकाळाचा अवाजवी पूर्वगौरव न करता आणि त्याबाबत वृथा न्यूनगंडदेखील न बाळगता तथ्यांवर आधारलेलं असं एक वास्तवाच्या जवळ जाणारं आकलन इतिहासकार तयार करू शकतात. ही संधी मिळणं ही इतिहासकारांसाठी मोठी आनंदाची बाब असते.

§§§

---

**लेखक : श्रद्धा कुंभोजकर,** एम. ए., पीएच. डी, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागात प्रमुख आणि प्राध्यापक म्हणून कार्यरत.

**इ-मेल :** shraddha@unipune.ac.in

*(कळीचे शब्द :- इतिहास, इतिहासकार, इतिहासाचे पुरावे, History, historian, evidences of history)*